श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

## पुर्नदरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

**विषय:– महाप्रसाद विभागात बनविण्यात येणाऱ्या लाडुमध्ये वापरण्याकरीता जायफळ पावडरची विहित पध्दतीने पुर्नदरपत्रके मागवून खरेदी करणेबाबत**

सन २०२६–२७ या वर्षभराच्या कालावधीकरीता महाप्रसाद विभागात बनविण्यात येणाऱ्या लाडूमध्ये वापरण्याकरीता जायफळ पावडरची विहित पध्दतीने खरेदी करण्याकरीता मोहोरबंद पुर्नदरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| पुर्नदरपत्रके प्रसिध्द दिनांक | –: | शनिवार दि. २८ फेब्रुवारी, २०२६ |
| कच्चा माल तपासणीसाठी सादर करावयाचा अंतिम दिनांक | –: | गुरूवार दि. ०५ मार्च, २०२६ सांय. ६.००वा. |
| पुर्नदरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | –: | बुधवार दि. ११ मार्च, २०२६ दु. ६.००वा |
| पुर्नदरपत्रके उघडण्याचा दिनांक | –: | गुरूवार दि. १२ मार्च, २०२६ दु. २.००वा |

## जायफळ पावडर पुर्नदरपत्रकांकरीता न्यासास सादर करावयाची कागदपत्रे

**अ) तांत्रिक कागदपत्रे (Technical Bid)**

३. अद्ययावत कंपनी नोंदणी दाखला / दुकाने नोंदणी दाखला, / तत्सम शासकीय परवाना/ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रमाणपत्र/ ISO 9001 Certificate

४. आयकर नोंदणी पॅन कार्ड **(Pan Card)**

३. वस्तू व सेवाकर नोंदणी दाखला **(GST Registration)**

४. अद्ययावत एफ. एस. एस. ए. आय. प्रमाणपत्र **(Fassai Registration Certificate)**

५. वार्षिक उलाढालीसंबंधित सनदी लेखापालाचे तीन वर्षाचे प्रमाणपत्र (आर्थिक वर्ष २०२२–२३, २०२३–२४, २०२४–२५)

६. जायफळ पावडरचा पुरवठा करण्याचा तीन वर्षाचा अनुभव दर्शविणारी कागदपत्रे (धार्मिक/ सामाजिकसंस्था/शासकीय/निमशासकीय कार्यालय/हॉटेल इ. ठिकाणी पुरवठा केल्याबाबतची कागदपत्रे उदा. बिल/कार्यादेश, पुरवठा आदेश इ. पैकी एक सादर करणे आवश्यक आहे.)

७. हमीपत्र

८. पुर्नदरपत्रके उघडण्याच्यावेळी कंपनी/संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत

ब) मूल्य दरपत्रक तांत्रिक लखोटयात सादर करू नये. ती स्वतंत्रपणे सादर करावी.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

## अटी व शर्ती

**प्रत्येक कंत्राटदाराने तांत्रिक कागदपत्रे आणि मुल्य दरपत्रक दोन वेगवेगळया मोहोरबंद (लाख लावलेल्या) लखोटयात (A4 लिफाफा) सादर करावीत. मोहोरबंद लिफाफ्यावर कामाच्या विषयाबाबतचा उल्लेख असावा.**

१) जायफळ पावडर पुरवठयाचा कालावधी हा प्रथम कार्यादेशाच्या दिनांक पासून ते ३१ मार्च २०२७ अखेर पर्यंत वैध राहील. तथापि, कार्यादेशाचा कालावधी संपल्यानंतर पुढील वर्षाकरीता कच्च्या मालाच्या पुरवठयासाठी दरपत्रक प्रक्रियेद्वारा नवीन पुरवठादाराची नेमणूक होईपर्यंत वा त्याने मालाचा पुरवठा सुरु करेपर्यंत पुरवठादारांस वरील कालावधीसाठी विहीत केलेल्या दरातच मालाचा पुरवठा करणे बंधनकारक राहील व त्याकरीता कोणत्याही प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. तसेच कालावधीबाबतचा न्यास व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम राहील.

२) दरपत्रकामध्ये सर्व समावेशक खर्चासह मूळ दर असावा व कर अतिरीक्त असा उल्लेख करावा.

३) पुरवठादारांस धार्मिक स्थळे, नामांकित कंपन्या, उपहारगृहे, अशा स्वरूपाच्या ठिकाणी जायफळ पावडरपुरवठा करण्याच्या कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असावा.

४) कंपनीची मागील ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल किमान रू. ८ लक्ष पेक्षा जास्त असल्याचे सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

५) जायफळ पावडरचे परिमाण हे ५ किलोच्या प्लास्टीक सिलबंद पिशवीमध्ये असणे आवश्यक आहे.

६) न्यासाच्या महाप्रसाद विभागाच्या आदेशाप्रमाणे वेळोवेळी माल पुरवावा लागेल. आवश्यकतेनुसार दरमहा अथवा कमी जास्त मुदतीत मालाची मागणी केली जाईल. एकदम सर्व माल घेतला जाणार नाही. मागणीनुसार माल स्विकारला जाईल तसेच मागणीपेक्षा जास्त आलेला माल स्विकारला जाणार नाही. मालाचे परिमाण अंदाजे असल्याने, प्रत्यक्षात कमी–जास्त मागणी होवू शकेल, त्याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.

७) पुरवठादाराने मालाची पोहोच स्वखर्चाने श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई येथे न्यासाचे महाप्रसाद विभागाच्या गोडाऊनमध्ये पॅकींग व फॉरवर्डींगसह दिली पाहिजे. श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासाकडून मालाच्या वाहतुकीचा व वाराईचा खर्च वेगळा दिला जाणार नाही. माल महाप्रसाद विभागाच्या गोडाऊन शिवाय इतरत्र उतरवू नये. असे केल्यास माल गोडाऊनमध्ये पोहचविण्याचे लेबर चार्जेस बिलातून कपात करण्यात येईल.

८) दरपत्रकामध्ये नमूद केलेल्या वार्षिक परिमाणापेक्षा जादा मालाची मागणी न्यासाकडून झाल्यास मालाचा पुरवठा मान्य दरानेच करण्याचे बंधनकारक राहील.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

९) न्यासास पुरवठा करावयाचा कच्चा माल व प्रयोगशाळा तपासणीसाठी सादर करावयाचा कच्चा माल FSSAI standards अथवा न्यासाने दिलेल्या विनिर्देशानुसारच (Specification) असावा. प्रयोगशाळा तपासणी अहवालाच्या निकषावर पुरवठाधारक अंतिम करण्यात येईल. अशी कार्यवाही करताना कच्च्या मालाच्या गुणवत्तेचा, प्रयोगशाळा तपासणी अहवालाचा प्रथम विचार करण्यात येईल. केवळ न्युनतम दर प्राप्त झाला म्हणून दरपत्रक स्विकारण्याचे बंधन न्यासास/समितीस असणार नाही.

१०) दरपत्रकामध्ये स्वीकृत केलेले दर वर्षभरासाठी कायम राहतील. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव ठेका कालावधीत भाववाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही. आपण माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा माल पुरवठा न केल्यास याप्रकरणी न्यास व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम राहील.

११) पुरवठादाराने पुरवठा आदेश निर्गमित झाल्यापासून कमाल ७ दिवसात मालाचा पुरवठा करणे आवश्यक असेल. विहीत मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यामुळे न्यासाची अडचण/नुकसान होऊ नये म्हणून न्यासाला बाजारभावाने आवश्यकतेनुसार किंवा पुरवठा आदेशात नमूद परिमाणाचा माल खरेदी करण्याचे अधिकार/मुभा असेल. बाजारभावाने खरेदी केल्यामुळे जादा अदा केलेल्या रकमेची भरपाई पुरवठादारास करावी लागेल. सदर भरपाई देयकाच्या रकमेतून करण्यात येईल

१२) देयकामध्ये मूळ दर व अतिरिक्त कर दराचा उल्लेख करावा. प्रचलित नियमानुसार आवश्यक ती करकपात केली जाईल. देयक सादर करतांना देयकात, खरेदी आदेशातील वर्णनाप्रमाणेच मालाचे नावाचा पुरवठा करणेत आलेल्या मालाची तपासणी करून, त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच देयक अदा करण्यात येईल. मालाच्या पुरवठयाबाबत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१३) पुरवठादारास देयकाची रक्कम कंपनीच्या नावे आर.टी.जी.एस.द्वारे अदा करण्यात येईल.

१४) पुरवठाधारक हा हिंदू असावा.

१५) मालाचा पुरवठा आदेश व देयकाची रक्कम न्यास कार्यालयातून अदा होणार असल्यामुळे सदरील व्यवहाराबाबत वाद झाल्यास तो मुंबई कोर्टाचे न्याय संवाद कक्षेत राहील.

१६) माल पाठविताना रविवार व मंगळवार खेरीज सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजता पाठविण्याची दक्षता घेणे आवश्यक असेल. रविवार व मंगळवार या दिवशी माल उतरवून घेतला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. न्यासाच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत माल उतरविण्यात यावा. परस्पर माल उतरवून दिल्यास सदर मालाच्या हिशोबाची व प्रदानाची जबाबदारी न्यासावर राहणार नाही.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

(१७) पुरवठादाराने सदोष माल उपलब्ध केल्यास पुरवठादाराचा करार तात्काळ रदद् करून नव्याने दरपत्रक प्रक्रिया करण्याचा अधिकार न्यासास राहील. सदर पुरवठादारास काळया यादीत अंतर्भुत करण्यात येईल.

१८) मुल्य दरपत्रकामध्ये न्युनतम ठरणाऱ्या दरपत्रकधारकास जायफळ पावडरचा नमूना तपासणीसाठीचे शुल्क न्यासाकडे अदा करावे लागेल.

१९) अपूर्ण कागदपत्रासाहित सादर केलेली दरपत्रके विचारात न घेता अपात्र ठरविली जातील. दरपत्रके स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा संपूर्ण अधिकार न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे त्याबद्दलची कारणे देणे न्यास व्यवस्थापन समितीवर बंधनकारक राहणार नाही.

२०) दरपत्रकात नमूद कच्च्या मालाचा नमूना २०० ग्रॅम बरणीत भरून गुरूवार दि. ०५ मार्च, २०२६ रोजी सांयकाळी ६.०० वाजेपर्यंत न्यासाच्या प्रतीक्षालय इमारतीतील तळमजल्यावरील टपाल कक्षात जमा करणे आवश्यक राहील. निविदाकाराने तपासणीसाठी येणाऱ्या खर्चाची रक्कम रू. १,३२०/- भरून त्याची पोच घ्यावी.

२१) उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. पुरवठादाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

| | |
|---|---|
| **श्रीमती वीणा पाटील, कार्यकारी अधिकारी** | ९९३०९४२४२८ |
| **डॉ.संदीप राठोड, उप कार्यकारी अधिकारी** | ७९७७७५३७१६ |
| **श्री. मंगेश कुंटे, पर्यवेक्षक** | ९७०२०२०३४२ |

(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

## मुल्य दरपत्रकाचा तपशील

**विषयः– महाप्रसाद विभागात बनविण्यात येणाऱ्या लाडुमध्ये वापरण्याकरीता जायफळ पावडरची विहित पध्दतीने दरपत्रके मागवून खरेदी करणेबाबत**

नावः–––––––––––––––––––––––––––––––––––––

पत्ताः–––––––––––––––––––––––––––––––––––––

–––––––––––––––––––––––––––––––––––––––––

पॅनकार्ड क्रमांक :–––––––––––––––––––––––––––––

सेवाकर नोंदणी क्रमांक :–––––––––––––––––––––––––

| अ. क्र. | कच्च्या मालाचा तपशील | मूळ दर | प्रती नग दर (कर–सर्व समावेशक खर्चासह दर) | प्रती नग दर (सर्व करांसहीत–सर्व समावेशक खर्चासह दर) |
|---|---|---|---|---|
| १. | जायफळ पावडर | | | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का